# मे–कामगार दिन

एक मे हा कामगार दिन आहे. जागतिक कामगार वर्गाच्या एकजुटीचा, वर्गशत्रूविरूद्ध लढण्याची प्रतिज्ञा घेण्याचा हा हक्काचा दिवस. भारतामध्ये १९२७ साली प्रथम १ मे हा कामगार दिन म्हणून साजरा करण्यात आला. या दिवशी हक्काची सुट्टी मिळविण्याकरिता अनेक झगडे झाले. समाजवादाचा बुरखा पांघरणाऱ्या कॉंग्रेसने स्वातंत्र्यानंतरही हा हक्क मान्य केला नाही.

त्या मागे एका फार मोठ्या कामगार लढ्याचा इतिहास आहे. १८८० साली दारिद्र्यात खितपत पडलेले लाखो लोक आपले नशीब काढण्याकरिता अमेरिकेकडे धाव घेऊ लागले. अमेरिकेतील संपत्तीबद्दल, भरपूर काम व मजुरी, सामाजिक न्याय इत्यादिबद्दल मालक व कंत्राटदार या गरीब लोकांना खुलबून सांगत व आपल्या कामासाठी त्यांना अमेरिकेत घेऊन येत. परंतु प्रत्यक्ष अमेरिकेत आल्यावर मात्र त्यांचे खरे स्वरूप त्यांना स्पष्ट होई. खाणीमध्ये, रेल्वेकंपन्यात, पोलाद कारखान्यात हे लोक कामगार म्हणून कामाला लागत. अत्यंत कमी मजुरीवर १२–१४ तास अमानुष परिस्थितीत कामगारांना काम करावे लागत असे. ते ब्लास्ट फर्नेसच्या जवळ गरमीमध्ये होरपळत, गुडघाभर पाणी असलेल्या खोल व धोकादायक खाणीमध्ये घाम व रक्त सांडत, रेल्वेबांधणीत डोंगर फोडून बोगदा बनवत. मजुरी अतिशय कमी असे. मालक सांगेल ते कोणतेही, कसलेही काम करावे लागे.

१२-१४ तासांचा दिवस सर्वत्रच होता. काही ठिकाणी तर १८ तासही काम करावे लागे. १८८३-८५ च्या काळात मंदीची लाट आली. बेकारांची संख्या दररोज वाढत होती. सर्वत्र संप व्हायला सुरूवात झाली. कामगार संघटना तयार होत होत्या व मालक त्या मोडण्याचा कसोशीने प्रयत्न करीत होते. पिंकरटन एजन्सी नावाची सशस्त्र सैन्य असलेली खाजगी संस्था भांडवलदारांना माफक भावात संपफोडे पुरवत असे. कामगारांच्या संघटनात फूट पाडणे व त्यांची बदनामी करणे, खुनाखुनी, संप फोडणे ह्या गोष्टीबद्दल ही संस्था प्रसिद्ध होती. अशा परिस्थितीतही कामगार संघटना वाढत होत्या.

कामगारांची प्रमुख मागणी होती आठ तासाचा दिवस. १८८४ मध्ये भरलेल्या कामगार संघटनांच्या परिषदेने ठराव मंजूर केला की एक मे १८८६ च्या आत सगळीकडे आठ तासांचा दिवस मंजूर करावा तसे न झाल्यास १ मे पासून तीव्र आंदोलन सुरू करण्यात येईल. जागोजागी आंदोलने सुरू झाली. कित्येक कामगार पोलिसांच्या गोळीबाराला बळी पडले. शेवटी आठ तासाचा दिवस जवळ जवळ सगळीकडेच मान्य केला गेला. १८८६ मध्ये पॅरीसमध्ये भरलेल्या दुसऱ्या कम्युनिस्ट आंतरराष्ट्रीय संघटनेच्या बैठकीत १ मे हा दिवस कामगारांचा आंतरराष्ट्रीय दिवस घोषित करण्यात आला. व तेव्हापासून आजतागायत तो साजरा करण्यात येतो.

आता स्त्रीयांच्या दृष्टीने दुसरी महत्वाची गोष्ट लक्षात घेतली पाहिजे. फक्त कारखान्यात किंवा शेतावर श्रम करून तिचे काम संपते का? मुळीच नाही. घरकाम स्वयंपाक पाणी, मुलांचे सारे तिलाच करावे लागते. कामगार म्हणून तिला भांडवलदाराकडे काही तास काम तर करावेच लागते त्याशिवाय किती तरी तास तिला घरी राबावे लागते. श्रम–शक्तीला (मुलांना) जन्माला घालण्याचे काम तर निसर्गानेच तिच्यावर सोपविलेले आहे. आणि म्हणूनच तिच्या दृष्टीने कामाचा दिवस हा सोळा सतरा तासांचा होतो. म्हणजे केवळ श्रम–शक्तीचे उत्पादन आणि पुनरुत्पादन यामध्येच तिचा दिवसाचा सर्व वेळ खर्च होतो.

आजचा आठ तासाचा दिवस हा कामगारांचा हक्क हे कामगारांनी उभारलेल्या वर्ग–लढ्याचे फळ आहे. पण फॅक्टरीतील कामाचा दिवस कमी करण्यासाठी कामगाराने दिलेला लढा हा स्त्री कामगारांच्या दृष्टीने फारच अपुरा आहे. कारण भांडवलशाहीच्या सुरवातीच्या काळात १६–१८ तास अमानुषपणे राबवल्या जाणाऱ्या कामगारांची स्थिती आणि आजच्या कामगार स्त्रीची स्थिती फारशी वेगळी नाही !

तेव्हा अपल्या दृष्टीने अतिशय महत्वाचा असणारा हा १ मे दिन चांगल्या प्रकारे साजरा करण्यासाठी, आपली शक्ती वाढविण्यासाठी जिथे जिथे कामगार, कष्टकरी जनता हा दिवस साजरा करील तिथे तिथे आपण स्त्रीया मोठ्या संख्येने, पुढाकार घेऊन या १ मे च्या कार्यक्रमात सहभागी होऊया. ——विपुल मेहता